प्रेस प्रकाशन PRESS RELEASE

भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA

संचार विभाग, केंद्रीय कार्यालय, एस.बी.एस.मार्ग, मुंबई-400001
Department of Communication, Central Office, S.B.S.Marg, Mumbai-400001
फोन/Phone: 022-22660502

वेबसाइट : www.rbi.org.in
Website : www.rbi.org.in
ई-मेल email: helpdoc@rbi.org.in

जून 26, 2019

**नॅशनल अर्बन को-ऑपरेटिव बँक लि. बाहराइच (यु.पी.) ह्यांचेवर दंड लागु**

बँकिंग विनियामक अधिनियम 1949 च्या (सहकारी सोसायट्यांना लागु असलेला) कलम 46(4) सह वाचित कलम 47 अ (1)(क) खाली तिला देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन, भारतीय रिझर्व्ह बँकेने, नॅशनल अर्बन को-ऑपरेटिव बँक लि. बाहराइच (यु.पी.) ह्यांचेवर रु.1,00,000/- (रुपये एक लाख) आर्थिक दंड लागु केला असून, तो दंड, आरबीआयच्या तपासणी अहवालाचे अनुपालन सादर न करणे, तुमचा ग्राहक जाणा (केवायसी) मार्गदर्शक तत्वे, बँकिंग विनियामक अधिनियम 1949 च्या (एएसीएस) कलम 36 (1) खाली दिलेल्या पर्यवेक्षकीय सूचना, क्रेडिट इन्फर्मेशन कंपन्यांचे सभासदत्व व आंतर बँकीय सकल व प्रतिपक्ष एक्सपोझर मर्यादा ह्यावरील प्रुडेंशियल नॉर्म्स ह्याबाबत आरबीआयने दिलेल्या सूचनांचे उल्लंघन केल्याबद्दल लावण्यात आला आहे.

भारतीय रिझर्व्ह बँकेने वरील बँकेला एक कारणे दाखवा नोटिस पाठविली होती. त्यावर वरील बँकेने तिचे लेखी उत्तर सादर केले होते. ह्या प्रकरणातील सत्य विचारात घेऊन भारतीय रिझर्व्ह बँकेने निष्कर्ष काढला की वरील उल्लंघने सिध्द होत असून त्यासाठी दंड लावणे आवश्यक आहे.

**योगेश दयाल**
मुख्य महाव्यवस्थापक

**प्रेस प्रकाशन : 2018-2019/3046**